दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.२८ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २०९ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • saturday 28 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 209 • Pages 4 • Rate 4 Rs

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी घेतली केंद्रिय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट

**मुंबई**–महाराष्ट्र राज्यातील कृषी क्षेत्राचा सर्वांगीण विकास, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होत असून, या योजनांमध्ये शेतकऱ्यांचा वाढता सहभागही दिसून येत आहे. मात्र, या वाढत्या प्रतिसादामुळे काही महत्त्वाच्या योजनांसाठी मंजूर निधी अपुरा पडत असल्याने अतिरिक्त निधीची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (झच–ठघतध) अंतर्गत अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे करण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.आज कृषी भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी यासंदर्भातील पत्र सादर केले.

# उजनीचे पाणी मांजरा धरणात आणा; खा.बजरंग सोनवणेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केंद्राचे वेधले लक्ष

## संसदेत उठविला आवाज, शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्याचीही मागणी

दैनिक वादळ वार्ता
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२७ मार्च रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवला. सोलापूरच्या उजनी धरणातून मांजरा नदीमार्गे मांजरा धरणात पाणी आणण्याचा प्रकल्प त्वरित मार्गी लावावा, अशी आग्रही मागणी करत त्यांनी बीडच्या दुष्काळी परिस्थितीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.दिल्लीत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीडचे खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी दुष्काळ आणि अस्मानी संकटाबाबत खा.सोनवणे यांनी आपल्या भाषणात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले की, बीडचा शेतकरी दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसतोय. यावर्षी त्यात वादळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाची भर पडली आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे कष्टाचे पीक डोळ्यादेखत मातीत जात असून, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. या अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत असून ही बाब अत्यंत




गंभीर आणि वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. बीड जिल्ह्यातील दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी बाहेरून जिल्ह्यात पाणी आणल्याशिवाय पर्याय नाही. बीड जिल्ह्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी उजनीचे पाणी मांजरा धरणात आणणे हाच एकमेव पर्याय असल्याचे सोनवणे यांनी ठामपणे सांगितले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास बीडच्या शेतकऱ्यांसाठी ते 'जीवनदायी' ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**दिरंगाईवर ओढले ताशेरे**

१ बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेळेत कर्ज मिळत नाही, शेतीच्या योजनांचा लाभही उशीरा मिळतो, एकूणच जिल्ह्यातील प्रशासकिय दिरंगाई कमी व्हावी, असेही ते म्हणाले.

२ शेतकऱ्यांना कर्जव्याज सवलत, अनुदान आणि पीकविम्याची रक्कम वेळेवर मिळत नाही. हक्काच्या पैशांसाठी बळीराजाला बँकांचे उंबरठे झिजवावे लागतात.

३ सोयाबीन, मका, तूर आणि ज्वारीची हमीभावाने खरेदी तर होते, पण त्याचे पैसे मिळायला महिनोन् महिने वाट पाहावी लागते. हा अन्याय तातडीने थांबवून चुकारे वेळेत देण्याची मागणी त्यांनी केली.

४ व्याज सवलतीसारख्या अनेक योजना कागदावरच राहतात. पात्र शेतकऱ्यांना या योजनांपासून वंचित ठेवणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी संबंधित मंत्रालयाकडे केली.

**मराठवाड्याच्या हक्काचे पाणी, मदत आणि न्याय मिळेपर्यंत माझा हा लढा थांबणार नाही. बीडच्या शेतकऱ्याचा आवाज मी संसदेत असाच बुलंद ठेवेन. बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या विश्वासाने दिल्लीत पाठविले असून मी त्यांचे प्रश्न मांडण्यास कमी पडणार नाही.**
**–खा.बजरंग सोनवणे, बीड.**



## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई,जबरी चोरी प्रकरणाचा उलगडा ; एक आरोपी जेरबंद,दुसरा फरार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरात घडलेल्या जबरी चोरी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जलद व अचूक तपास करत उलगडा केला आहे.या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी अद्याप फरार आहे.दि.२३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६-१५ वाजण्याच्या सुमारास समतानगर येथील बालासाहेब सोपानराव घुले हे आपल्या दुकानाकडे जात असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवून मोबाईल फोन व रोख २००० रुपये जबरीने हिसकावून नेले होते.या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४९/२०२६ नुसार दाखल करण्यात आला होता.घटनेची गांभीर्याने दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली.गुप्तमाहिती,



तांत्रिक विश्लेषण व सतत पाठलागाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.या दरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून आरोपी आवेज खाजा शेख रा. कोकिसपीर,केज याला ताब्यात घेतले.चौकशी दरम्यान त्याने आपल्या साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.यागुन्ह्यातील दुसरा आरोपी सोहेल मोहम्मद शेख रा. अजिजपुरा,केज हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत,अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, पोलीसनिरीक्षक शिवाजी बास्टे,स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने,पोलीस हवालदार महेश जोगदंड, पोलीस हवालदार दिलीप गीते तसेच चालक पोलीस हवालदार गणेश मराडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे केज शहरातील गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

## केज येथील न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभाचे रविवारी आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालय परिसरातील नवीन न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ येत्या रविवारी,दि.२९ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १०-३० वाजता हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती निमंत्रकांकडून देण्यात आली आहे.कोनशिला समारंभ कार्यक्रमाला उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राहणार उपस्थित रहाणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर चंद्रकांत संत आणि माननीय न्यायमूर्ती श्री.अभय ज. मंत्री यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. तसेच,या प्रसंगी माननीय न्यायमूर्ती श्री.सिद्धेश्वर सुंदरराव ठोंबरे (मुंबई




उच्च न्यायालय) यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे.प्रमुख उपस्थितीमध्ये राजस्थान ऊच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती श्री.संभाजीराव शिवाजीराव शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच नियोजन बीड चे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.सुधीर बाबूराव भाजीपाले आणि केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड.महादेव संपतराव लाड यांनी काम पाहिले आहे.न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या या विस्तारीकरणामुळे केज परिसरातील पक्षकार आणि वकिलांची मोठी सोय होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्यास जास्तीत जास्त नागरिकांनी व कायदे तज्ज्ञांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे स्थळ अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय परिसर,केज, असुन रविवार,दि.२९ मार्च २०२६,सकाळी १०-३० वाजता हा समारंभ संपन्न होणार आहे.

## काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील यांनी घेतली काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मल्लिकार्जुन खरगे यांची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्री.आदित्य दादा पाटील यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी आदित्य पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन खरगे यांचे स्वागत केले आणि विविध विषयांवर चर्चा केली.या सदिच्छा भेटी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, आगामी निवडणुकांचे नियोजन आणि पक्ष संघटनेच्या बळकटी करणाबाबत सविस्तर चर्चा केली.आदित्य पाटील यांनी राज्यातील जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली.

राज्यातील आगामी राजकीय आव्हाने पेलण्यासाठी पक्षश्रेष्ठीं कडून मिळणारे पाठबळ महत्त्वाचे ठरणार असल्याचे आदित्य पाटील यांनी मत व्यक्त केले आहे.

## प्रकाशा गावाच्या पाणी प्रश्नावर प्रशासन सज्ज; गोमाई नदी पुलाच्या कामाचीही पाहणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रकाशा गावाच्या पाणी समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी उपविभागीय अधिकारी कृष्णकांत कनवरिया यांनी २३ मार्च २०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. प्रशासनाच्या या तत्परतेमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या दौऱ्यात त्यांनी गोमाई नदीवर सुरू असलेल्या पुलाच्या कामाची पाहणी करत कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. यासोबतच प्रकाशा गावातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी वापरात असलेल्या कुपनलिकेची सखोल तांत्रिक तपासणी करण्यात आली.



पाहणी दरम्यान कृष्णकांत कनवरिया यांनी संबंधित यंत्रणांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत त्यात सध्या वापरात असलेल्या कुपनलिकेचे भूसंपादन प्रक्रियेतून संरक्षण करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. नवीन कुपनलिकांसाठी जल उत्पन्न चाचणी त्वरीत पूर्ण करावी.पाणीपुरवठा अधिक प्रभावी करण्यासाठी नवीन मोटारींची तात्काळ चाचणी घ्यावी.प्रकाशा गावातील नागरिकांना नियमित व शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने थेट स्थळावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या भेटीद्वारे स्थानिक समस्या समजून घेत त्वरित उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे. ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. प्रशासन व स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयातून पाणी प्रश्नावर प्रभावी व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या पाहणीदरम्यान कार्यकारी अभियंता धनंजय जाधव, उप अभियंता जी.डी. पवार,माजी जि.प. सदस्य रामचंद्र दशरथ पाटील तसेच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुपाली चाकणकरांचा राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील भोंदूबाबा अशोक खरात याला बलात्कार, महिलांशी गैरवर्तन, महिलांची फसवणूक अशा गंभीर आरोपांत अटक झाली आहे. या प्रकरणात विशेष तपास पथक तपास करत आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना आणि त्याच्या डोक्यावर छत्री धरताना तसेच अनेक कार्यक्रमात खरात सोबत वावरताना रुपाली चाकणकरांचे फोटो समोर आले. एका ट्रस्टमध्ये खरात आणि रुपाली चाकणकर हे दोघेही ट्रस्टी असल्याची माहिती समोर आली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आणि रुपाली चाकणकरांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला आहे.महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनाम्यानंतर रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा द्यावा लागल्यामुळे त्यांना अशोक खरात प्रकरण भोवल्याचीच चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या चिंतेचा विषय–खा.रजनीताई पाटील




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात ही बाब गंभीर आहे.सरकार सांगते आत्महत्या कमी झाल्या मात्र आत्महत्या वाढलेल्या आहेत.ओला दुष्काळ,अतिवृष्टी, नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे

मराठवाड्यात दुष्काळ आणि विदर्भ भागांतील हवामान बदल आणि अनियमित पावसाचा प्रश्न खरोखरच गंभीर आहे.कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेल्या या भागातीलशेतकऱ्यांसाठी शाश्वत उपाययोजनांची नितांत गरज असल्याचे खा.रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत शेतकरी प्रश्नावर आवाज उठवला.मराठवाडा हा सलग दुष्काळ आणि अतिवृष्टी अशा दोन्ही टोकाच्या हवामानाचा सामना करतो.त्यामुळे येथे हैदराबादच्या धर्तीवर एक विशिष्ट प्रादेशिक केंद्र (ठशसळेपरश्र उशपींश ेष उठखऊ-) असावे,अशी मागणी खा. रजनीताई पाटील यांनी केली.अंतर्गत मराठवाड्यात आणि विदर्भात 'अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प गतीने पुढे गेले पाहिजे हा सवाल उभा केला.

# संपादकीय

## कणाकणाने मृत्यूकडे...



जगभरात सर्वाधिक हवाप्रदूषण असलेल्या देशांच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक सहावा असल्याचा निष्कर्ष देशातील शहरांच्या घुसमटलेल्या वस्तुस्थितीचा निदर्शक आहे. ‘आय क्यू एअर’ या स्विस कंपनीने सादर केलेल्या सन २०२५ च्या जागतिक हवा गुणवत्ता अहवालामध्ये जागतिक क्रमवारीत भारत तिसऱ्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरल्याचा आनंद मानायचा, की जगातील तिसरी अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या महासत्तेला पाकिस्तान, बांगलादेश, ताजिकिस्तान, चाड आणि काँगो अशा देशांच्या पंक्तीत बसवल्याचा खेद; हे ज्याचे त्याने ठरवावे.पर्यावरण आणि आरोग्यासाठी सर्वाधिक घातक असलेल्या अतिसूक्ष्म धूलिकणांचे (पीएम २.५) भारतातील प्रमाण हे जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडापेक्षा दहा पट अधिक आहे, जगातील सर्वांत प्रदूषित शहरांमध्ये भारत, पाकिस्तान आणि चीनमधील अनेक शहरे आहेत आणि गेल्या तीन वर्षांतील तुलनेने स्वच्छ हवा असली, तरी प्रदूषणाच्या प्रमाणात जगातील पहिल्या दहा देशांमधील आपले स्थान कायम आहे.हवेचे प्रदूषण, हा फक्त हिवाळ्यात कोंडलेल्या दिल्लीच्या वार्ता ऐकण्यापुरता विषय राहिलेला नसून घरादारांत, रस्त्यारस्त्यांवर आणि खेडोपाडीसुद्धा नाकातोंडात शिरणारी धूळ, हे प्रत्येकाच्या अनुभवास येणारे वास्तव ठरले आहे. त्याचेच प्रतिबिंब या जागतिक अहवालात पुन्हा एकदा उमटले आहे. करोनामुळे सारे जग थांबल्याचा काळ सोडला, तर धूलिकणांने होणाऱ्या प्रदूषणाचा आलेख सतत धोकादायक पातळीवरच दिसतो. वाढते शहरीकरण, जीवघेणा धूर सोडणारी वाहने, ठिकठिकाणी सुरू असलेली बांधकामे–विकासकामे आणि त्यातून निर्माण होणारी धूळ आणि सिमेंटचे कण, जागोजागी साठणाऱ्या आणि जाळल्या जाणाऱ्या कचऱ्यातून होणारे प्रदूषण, कारखान्यांची धुराडी, शेतीत जाळले जाणारे पाचट आणि वीजकेंद्रांसह ठिकठिकाणी कोळशाचे ज्वलन, ही त्यामागील प्रमुख कारणे सर्वज्ञात आहेत. यंदाच्या या अहवालात उत्तर प्रदेशातील लोनी आणि आसाममधील बर्निहाट ही शहरे देशात सर्वाधिक प्रदूषित असल्याचे समोर आले आहे. सोबतच महाराष्ट्रातील सांगली, महाड, सोलापूर, जळगाव, मालेगाव आणि बेलापूरसारख्या शहरांतील ‘पीएम २.५’ चे प्रमाण धोकादायक असल्याचे हा अहवाल सांगतो. पुण्या–मुंबईत दररोज सिमेंटचेच श्वास घेणाऱ्या नागरिकांना तर अशा अहवालांचेही नवल नाही.देशातील हवा प्रदूषणामध्ये वाहनांचा वाटा २५ ते ३० टक्के, उद्योगांचा २० ते २५ टक्के, वीजनिर्मिती केंद्रांचा वाटा १५ ते २० टक्के असून कचरा जाळण्यामुळे होणारे हवेचे प्रदूषण १० ते २० टक्के आहे. हवेचे प्रदूषण ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, आरोग्यापुढील सर्वांत मोठ्या संकटांमध्ये त्याने स्थान मिळवले आहे. या विषारी हवेमुळे रक्तदाब, हृदयरोग, पक्षाघात, श्वसनमार्गातील निरनिराळे संसर्ग, मधुमेह, फुप्फुसांचे विकार आणि कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली असून, दर वर्षी काही लाख नागरिकांच्या अकाली मृत्यूस ते कारण ठरले आहे.प्रमुख शहरांमधील हवेचे प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी ‘नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम’ हाती घेण्यात आला; मात्र यथातथा अंमलबजावणीमुळे त्यातून फारसे काही हाती लागलेले नाही. या कार्यक्रमाअंतर्गत मुंबई–पुण्यासारख्या प्रमुख शहरांवरच लक्ष केंद्रित करण्यात येते. अन्य शहरांची निधी मिळवतानाही दमछाक होते. अनेक शहरांत त्या निधीचा वापरच होत नाही; झाला तरी झाडलोट–पाणी फवारण्यासारख्या कामचलाऊ उपाययोजनांसाठी होतो, असे आढळते. वाहनांचे प्रदूषण रोखणे किंवा औद्योगिक प्रदूषणाच्या कडक नियमांची अंमलबजावणी अशा मूळ उपाययोजनांकडे होणारा काणाडोळा, ही सर्वांत मोठी अडचण आहे.दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणून भारताने सन २०७०पर्यंत ‘नेट झिरो’ची घोषणा केली आहे. त्यानुसार शाश्वत ऊर्जास्रोतांचा वापर वाढवणे, बॅटरी वाहनांना प्रोत्साहन या दिशेने वाटचाल सुरू आहे; मात्र सौरऊर्जेच्या निर्मितीतील वाढ आणि कोळशाचा वापर तीन टक्क्यांनी घटवण्यात यश असले, तरी आजही देशातील ७० टक्के वीजवापर हा कोळशावरच आधारित आहे. एका रात्रीत चित्र बदलणार नाही. ऊर्जासुरक्षा, गरीबी निर्मूलन , आर्थिक वाढ आणि प्रदूषण नियंत्रण अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांमधून संतुलित पद्धतीने मार्ग काढावा लागेल. मात्र, या उपाययोजनांची गती वाढली नाही, तर ‘पीएम २.५’ च्या कणाकणाने आपण मृत्यूच्या अधिक निकट निघालो आहोत, या वास्तवाची जाणीव ठेवलेली बरी.

# दुबार मतदान लोकशीला घातक,लोकशाही टिकवायची असेल तर निवडणुकीत प्रदर्शकता आणा–दीपक निकम

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

आपल्या देशाची आदर्श लोकशाही आहे. लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया ही अचूक, पारदर्शक आणि त्रुटीविरहित मतदानावर आधारित असणे अत्यावश्यक आहे. परंतु पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांमधील गंभीर त्रुटी, दुबार नावे, चुकीचे प्रभागनिहाय स्थलांतर व दुहेरी मतदान हे लोकशाहीला घातक आहे. निवडणूक प्रक्रियेच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तेव्हा निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करायची असेल तर तातडीने विशेष पडताळणी मोहीम हाती घेऊन यादीतील गंभीर त्रुटी निकालात काढाव्यात अशी मागणी शिवसेना पनवेल विधानसभा संघटक ( उबाठा ) दीपक निकम यांनी प्रांत अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाने केली आहे.पनवेल विधानसभा मतदारसंघात हजारो मतदारांची नावे दुबार असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. ठशीशिशपींरींळेप ेष ींहश झशेश्रिश – लीं, १९५० मधील कलम १७ नुसार कोणत्याही व्यक्तीचे नाव एका पेक्षा अधिक मतदारसंघात नोंदवता येत नाही, तसेच कलम १८ नुसार एका मतदारसंघातही एकापेक्षा अधिक ठिकाणी नाव असणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नाही. अशा नोंदी मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. त्यामुळे संबंधित विभागाची पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जात नाही असेच समोर येते.पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे त्यांच्या वास्तव निवास स्थानाशी विसंगत प्रभागांमध्ये नोंद झाल्याचे आढळून आल्या आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल नोंदणी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापराच्या युगात अशी प्राथमिक पातळीवरील प्रशासकीय त्रुटी अस्वीकार्य आहेत. पनवेल परिसरात घाटमाथा, कोकण, दक्षिण भारतीय व उत्तर भारतीय नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. त्यापैकी अनेक मतदारांची नावे त्यांच्या मूळ गावच्या मतदार यादीत कायम असून, त्याचवेळी पनवेल विधानसभा मतदारसंघातही नोंद असल्याची शक्यता नाकारता येत नाही. Election Commission of India च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अशी दुहेरी नोंद तत्काळ शोधून वगळणे आवश्यक आहे, अन्यथा दुहेरी मतदानाची शक्यता लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवू शकते.

मतदार यादीतील या गंभीर घोळाबाबत केवळ नागरिकांनी तक्रारी नोंदवाव्यात आणि त्यानंतर विभागाने दुरुस्ती करावी, ही भूमिका पुरेशी नाही. निवडणूक प्रशासनाने स्वतंत्र विशेष यंत्रणा निर्माण करून धराधर पडताळणी, दस्ताऐवज तपासणी, दुबार नावे शोध मोहीम, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि चुकीच्या प्रभागातील नोंदी दुरुस्त करणे अशी व्यापक मोहीम राबविणे आवश्यक आहे. बैठका या केवळ औपचारिकतेपुरत्या मर्यादित राहू नयेत. चहा–बिस्कीट आणि कागदी चर्चेपलीकडे जाऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणा कार्यान्वित झाली पाहिजे. मतदार यादी निर्दोष करणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवण्याची घटनात्मक जबाबदारी आहे.लोकशाहीला घातक ठरणाऱ्या मतदान यादीतील बाबींची गांभीर्याने विचार करून तातडीने दखल घेऊन प्रभावी कार्यवाही करण्यात यावी, आणि लोकशाही वाचवावी अशी मागणी शिवसेना संघटक दीपक निकम यांनी निवडणूक निर्णय अधिकारी प्रांत अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# महेंद्रशेठ घरत कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक


**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत मंगळवारी (ता. २४) कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या दर्शनासाठी गेले होते. यावेळी त्यांनी खणा–नारळाने ओटी भरून देवीची पूजा केली. चैत्र नवमीच्या पूर्वसंध्येला घेतलेले दर्शन विलोभनीय असल्याचे महेंद्रशेठ घरत म्हणाले. समाजातील दिनदुबळ्यांना मदत करण्याची मनोकामना पूर्ण करण्याचे बळ लाभू दे, अशी प्रार्थनाही त्यांनी महालक्ष्मीकडे केली. कोल्हापूरची महालक्ष्मी (अंबाबाई) हे महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक मुख्य शक्तिपीठ आहे. हे मंदिर प्राचीन करवीर निवासिनीचे आहे. स्थापत्यशैलीचे एक उत्तम उदाहरण म्हणून महालक्ष्मीच्या मंदिराची ख्याती आहे. महालक्ष्मीचे मंदिर हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते, त्यामुळे महेंद्रशेठ घरत दरवर्षी कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक होतात आणि देवीची मनोभावे पूजा करतात.

# एन.एम.एम.एम.परीक्षेत पिरकोन महाविद्यालयातील मुलींनी मारली बाजी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**



केंद्र शासनाच्या आर्थिक दुर्बल घटकामध्ये मोडणाऱ्या शाळेय विद्यार्थ्यां साठी एन.एम.एम.एस परीक्षांचे नियोजन केले जाते. उरण पूर्व विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातून एकूण १५ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते त्यापैकी १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यात १० पैकी ९ मुलींनी बाजी मारली तर मुला पैकी एकच विध्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयात मुलींनीच बाजी मारले असे म्हटले जाते.

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हे विद्यालय ग्रामीण भागात असून या विद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. हे विद्यालय नसते तर या भागात अनेकांना शिक्षणाची दारे उघडली नसती. त्यामुळं हे विद्यालय या भागासाठी ठेवा आहे असेच म्हटले जाते.या विद्यालयाच्या प्राचार्या सौ. ए.ए.पाटील विभाग प्रमुख सौ.एम.एस.पाटील , प्रा.डाढाळे बी.बी., सौ. एस.सी.पाटील, श्री.एस.आर.म्हात्रे , सौ.डी.आर.पाटील, सौ. सी. ए. घरत, सौ. वर्षा पाटील, कु. कल्याणकर एन.बी, पाटील पी.एम सर या सर्व शिक्षकवृंदचे मोलाचं मार्गदर्शन लाभल्यानेच हे यश संपादन करू शकले असे विद्यालयाचे चेअरमन जीवन गावंड तसेच पिरकोन पंचक्रोशीतून विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात संस्कृतीचा जागर

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**





भक्ती, परंपरा आणि मातृशक्तीचा जल्लोष यांचा त्रिवेणी संगम ठाण्याच्या चैत्र नवरात्रोत्सवात अनुभवयास मिळाला. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने कोपरी येथील संत तुकाराम महाराज मैदानावर आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात बुधवारची सायंकाळ भक्तिरस आणि रंगतदार रास दांडियाच्या तालावर अक्षरशः रंगून गेली. भाविकांनी अंबे माँतेच्या गीतांवर संस्कृतीचा जागर केला.राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या सहस्त्रचंडी हवनात्मक नवकुंडीय महायज्ञाच्या अष्टमी दिनी सहस्त्रचंडी याग आणि सांज आरती पार पडली. या पवित्र सोहळ्यात सौ. लता एकनाथ शिंदे, बिग बॉसच्या घरात कल्ला करणारी ठाणेकर अभिनेत्री जान्हवी किल्लेकर तसेच, अभिनेते मंगेश देसाई यांनी उपस्थिती दर्शवत अंबे मातेची सांज आरती केली. भक्तिमय वातावरणात झालेल्या आरतीने भाविकांच्या मनात श्रद्धेची दीपज्योत प्रज्वलित केली. यानंतर रंगलेल्या रंगाई प्रस्तुत ‘रंगीलो रास दांडिया नाईट’ च्या रंगतदार पर्वात अंबे माँतेचा गजर करीत अवघी स्त्री शक्ती एकवटली. सौ.लता एकनाथ शिंदे यांनीही रास दांडीयामध्ये सहभाग दर्शवला.प्रारंभी स्थानिक महिलांनी मंगळागौरचे विविध खेळ सादर करीत प्लास्टिक टाळुन पर्यावरण जपण्याचा मौलिक संदेश दिला. त्यानंतर ‘महाराष्ट्राची हास्य जत्रा’ फेम शाम बांगर यांच्या उपस्थितीत वादकांच्या सुरेल साथीत महिलावर्गाने रास दांडियाचा फेर धरला. गायक विजय धुरी, के. पौर्णिमा, हरीश ठक्कर आणि उर्मिला धनु यांनी सादर केलेल्या मराठी – हिंदी पारंपरिक गाण्यांसह देवी गीतांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. अभिनेत्री जान्हवी किल्लेकर हिनेही दांडियात सहभाग घेतल्याने महिलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. तिच्यासोबत दांडिया खेळत सेल्फी घेण्याचा आनंद महिलांनी मनसोक्त लुटला. रास दांडीयाच्या समारोप पर्वात उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी सभामंडपात उपस्थिती दर्शवुन कलाकारांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे अमित काकडे यांनी अत्यंत रंगतदार पद्धतीने करत उपस्थित महिलांना रास दांडीयाच्या नृत्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या उत्साही शैलीमुळे 'रास दांडीया' खेळात अधिक रंगत आली. या सोहळ्यास महापौर शर्मिला पिंपळोलकर, जयप्रकाश कोटवानी, प्रमोद बनसोडे, राहुल लोंढे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात दिव्यासाठी अनेक कामांची तरतुद करावी–स्नेहा पाटील,नगरसेविका

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**



ठाणे महानगरपालिकेच्या २०२६–२७ च्या विशेष अर्थसंकल्प सभेत नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली. त्यात दिवा पुर्व – पश्चिमला जोडणारा उड्डाणपुल अनेक वर्षापासुन प्रलंबित असून काही जमिन हास्तांतर न झाल्यामुळे पुलाचं काम धिम्या गतीने सुरु आहे . यामुळे जमिन मालकांना योग्य तो मोबदला देऊन हास्तंतर प्रक्रिया जलदगतीने पुर्ण करावे, मुंब्रा फायर स्टेशन ते दिवा शिळ रोड रसत्याचे बांधकाम करून रस्ता खुला करण्यात यावा. दिवा –शिळ रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ बस स्टॅाप तात्काळ बांधण्यात यावा, अनेक नाले जे शहरातुन खाडीकडे जातात त्या पाण्याचा निचरा योग्या रितीने दृष्टीने पुनर्बांधणी करणे. मच्छी मार्केटसाठी योग्य जागा नियोजित करुन मार्केट बांधणे, मलःनिसाराण योजने अंतर्गत कामे तात्काळ करणे. दिवा पश्चिमला पाणी पुरवठा करण्यासाठी पुश थ्रु जलवाहिनी तात्काळ टाकणे. प्रलंबित ठिकाणी एल.ई.डी पथदिवे लावणे व दुरुस्थ करणे. दिवा शहरासाठी एक मॅकेनिकल स्वीपर मशिनसाठी तरतुद करून सफाई कामगारांची संख्या वाढविण्यात यावी. दिवा क्षेपणभूमीवर शास्त्रेक्त पध्दतीने प्रक्रिया केली जात आहे , पण रोज रात्री या क्षेपणभुमिवर आग लागते व त्यामुळे परिसरात धुराचे लोण पसरते ज्याचा परिणाम रहिवाशांच्या आरोग्यावर होत आहे . या क्षेपणभुमीवर आणाखी चांगल्या प्रकारे प्रक्रिया कशी करता येईल याकडे लक्ष देणे. शहरातील वातावरण आरोग्यदायक करण्याचा दृष्टीनं एक पाऊल पुढे म्हणुन शहरातील मुख्य दिवा–शीळ रोड सह मुख रसत्यांवर वृक्ष लागवड करण्यासाठी तरतुद करणे. नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली.

# साळींबा येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जन जागृती कार्यक्रम संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**वडवणी । प्रतिनिधी**

जागतिक वन दिनानिमित्त साळींबा येथे वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच,सदस्य,विविध मान्यवर, अधिकारी, व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

साळींबा ग्रामपंचायत अंतर्गत जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले तसेच ग्रामस्थांना वृक्षारोपण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी एस.डी. वायभासे, श्रीमती.डी आर शिंदे वनपाल वडवणी, एल जी वरवडे वनरक्षक वडवणी, मुंडे सा.व.म.वडवणी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व, झाडांचे मानव जीवनातील योगदान आणि वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज याविषयीसविस्तर मार्गदर्शन केले . यावेळी या कार्यक्रमाला सरपंच दिनेश नाईकवाडे, युवा नेते ओमराजे जाधव, ग्रामपंचायत सदस्य रामप्रसाद चव्हाण, सदस्य आकाश कांबळे, सदस्य बाबासाहेब खाडे, बालासाहेब मायकर,यासह ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## जावळी मुगळेवाडी चलबुर्गा शिवरस्त्याचे पवनचक्कीच्या अवजड वाहनाने नुकसान

# भारतीय जनता पक्षाचे डॉक्टर सेल जिल्हा उपाध्यक्ष डॉ.शंभुराजे भोसले यांची रस्ता दुरुस्तीची निवेदना द्वारे मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुका शेतरस्त्याचे जनक आ.अभिमन्यु पवार यांच्या संकल्पनेतुन जावळी ,मुगळेवाडी, चलबुर्गा हा शिव रस्ता व लामजना पाटी हायवे क्रमांक ४८५ महापुरुष रस्ता छत्रपती शिवाजी महाराज चौक लामजना पाटी ते बसवेश्वर चौक लातूर या रस्त्याला जोडणारा बाह्य वळण रस्ता हा जावळी ,मुगळेवाडी व चलबुर्गा हा शिवरस्ता शेतकर्यांच्या जिव्हाळ्याचा शेतरस्ता व शिवरस्ता असुन बाजुलाच नव्याने झालेल्या पवनचक्की प्लांटच्या बाजुला असलेल्या रस्त्याची अक्षरशा दुरावस्था झाली असुन या शेतरस्ता व शिवरस्त्याची दुरुस्ती मजबुतीकरण व डांबरीकरण करून दयावे यासाठी शंभुराजे भोसले यांनी निवेदन अर्जाद्वारे मागणी केली असुन

विनंतीपूर्वक अर्जात जावळी चलबर्गा, मुगळेवाडी शिव रस्ता व शेतरस्ता या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण तालुक्याचे आ. अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून झालेले आहे परंतु पवनचक्की कंपनी मालवा व टाटा कंपनी यांचा प्रकल्प या रस्त्या शेजारी उभा करण्यात आलेला आहे ,त्याच रस्त्यावर जवळपास तीन ते चार पवनचक्की पॉईंट ची उभारणी करण्याचे काम करण्यात आले आहे ,हा रस्ता जावळी,चलबुर्गा,मुगळेवाडी अपचंदा या गावातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून सदर गावातील उसाची पूर्ण वाहतूक या रस्त्याने होते तसेच सदरील गावातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील मालाची वाहतूक व शेतीतील मशागतीचे सर्व कामे करण्यासाठी या रस्त्याची रहदारी असुन अत्यंत गरज आहे, तथापि मालवा व टाटा कंपनी यांचा प्रकल्प या भागात काम करीत असल्याने या रस्त्यावरून त्यांच्या अतिशय जड वाहनाची वाहतूक या रस्त्यावर होत आहे त्यामुळे सदरील रस्ता पूर्णपणे उकडून निघालेला आहे ,तसेच सदरील कंपन्यांनी रस्त्याची डागडुजी केली खरी पण



आपल्या संबंधातील जवळच्या ठेकेदाराला घेऊन रस्ता डागडुजी थातूरमातूर पद्धतीने रस्त्याची दबाई न करताच थोडाफार मुरुम टाकलेले आहे ,व निकृष्ट दर्जाच काम करुन आणि तो मुरूम रस्त्याच्या आजुबाजूने टाकुन तो मुरूम रस्त्याच्या बाजूने नाल्या होत्या ,, त्या नाल्यात टाकलेला मुरुम अडकल्याने त्यामुळे या रस्त्याच्या बाजूला असलेल्या नाल्या पूर्णपणे बुजालेल्या आहेत या रस्त्याच्या पश्चिम बाजूस उंच जमिनीवर आहेत तर पूर्व बाजूला खोलगट भागात पाणी थॉबत असल्याने भविष्यामध्ये एखादा मोठा पाऊस पडला तरी या रस्त्यावर पाणी येऊन हा रस्ता पूर्णपणे वाहून जाण्याची शक्यता आहे ,त्यामुळे शासनाने लाखो रुपये खर्च करून रस्ता केलेला आहे तो पूर्णपणे उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही तरी संबंधित प्रशासनाने या रस्त्याकडे व या रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष द्यावे अशी प्रशासनाला विनंती या रस्त्याचा वापर करून पवनचक्की वाहतुकीने रस्ता खराब झाल्याने प्रशासनाने रस्त्यावर प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा व मालवा कंपनी व टाटा कंपनी या कंपन्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून हा रस्ता पूर्णपणे दुरुस्त करून घ्यावा आणि खराब रस्त्याचे डांबरीकरण व मजबुती करून करून द्यावे जेणेकरून भविष्यामध्ये या रस्त्यावरुन शेतकर्यांना शेती करण्यासाठी व शेतीमाल वाहतुक करण्यासाठी अडचनीचा सामना करावा लागु नये यासाठी प्रशासनाला वेळोवेळी विनंती अर्ज करून सुद्धा प्रशासन याकडे लक्ष देण्यात चालढकल करत आहे असा आरोप शेतकरी शंभुराजे भोसले यांनी केला असुन आज .औशाचे आमदार ,लातुर जिल्हाधिकारी ,औसा तहसिल व महसुल मंत्रालयाला निवेदन अर्ज देत रस्ता दुरुस्तीची मागणी केली असल्याच शेतकरी शंभुराजे भोसले यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले.

## दुनगांव येथे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड



**दैनिक वादळ वार्ता**
**दुनगांव । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा दुनगांव येथे दि २४ रोजी स्थानिक शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक पार पडली यावेळी गावातील प्रमुख व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. श्री. कलीमभाई शेख यांची अध्यक्षपदी तर श्री. प्रल्हाद जायभाये यांची उपाध्यक्षपदी निवड झाली, नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य यांचे अभिनंदन, करण्यात आले दोन्ही उमेदवार सुशिक्षित असल्या मूळे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड ते सार्थ ठरवतील असा विश्वास गावातील ज्येष्ठ वकील श्री पांडुरंग जायभाये व गावातील जेष्ठ नागरिकांनी व्यक्त केला. शाळेचे मुख्याध्यापक श्री बंडू बांगर सर, शाळेतील शिक्षक,शिक्षिका, आणि गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड मुख्याध्यापकपदी एस.बी.राजपुत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड शहरातील नामांकीत जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड शाळेचे मुख्याध्यापक म्हणून शाळेतील सेवाजेष्ठ माध्यमिक शिक्षक संजय भावलालसिंह राजपुत यांच्या नावाचे आदेश शिक्षणाधिकारी ( प्रा.) जिल्हा परिषद नांदेड यांनी दिनांक २४/०३/२०२६ रोजी पारित केले असून,तात्कालिन मुख्याध्यापक डी.जे.कांबळे यांनी त्यांच्याकडे असलेला मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त पदभार कमी करून सेवाजेष्ठ शिक्षकास मुख्याध्यापक पदाचा पदभार देण्यासंबधी मा.शिक्षणाधिकारी यांच्याकडे दोन मार्चला पत्र दिल्याने एस.बी.राजपुत याच्या नावाचे आदेश चौविस मार्चला जिल्हा परिषदेकडून निर्गमित करन्यात आल्याने सदरिल आदेशाचे पालन करत डी.जे.कांबळे यांनी




एस.बी.राजपुत यांना पंचविस मार्च रोजी मुख्याध्यापक पदाचा पदभार देवून त्यांचे शाल,पुष्पहार घालून स्वागत केले.व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या प्रसंगी शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप देवकांबळे, दिपक लोहबंदे, व्हि.एस.जाधव, देशमुख ए.डी.मुद्देवाड बी.आर.माधव पाटील,भालेराव एच.एम.सुधीर शृंगारे,अशालत्ता स्वामी,अश्विनी कुलकर्णी, येवतीकर, कदम,गडगिळे,संगिता धनशेट्टी,चंद्रकांत डावकरे,भवानीसिंह चौहाण,सय्यद अकबर,पटेल,जिवनराव वडजे,पंढरी भालेराव सह सर्व शिक्षकांकडून नुतन मुख्याध्यापक राजपुत सरांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा.! देन्यात आले.विद्यार्थी गुनवत्ता वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करून शासनाच्या विविध उपक्रमात सर्व शिक्षकाच्या सहकार्याने सहभाग नोंदवून शासन नियम व शिस्तीचे पालन करत निष्ठेन काम करून शाळेचे नाव उंचीवर नेन्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेन...

नुतन मुख्याध्यापक एस.बी.राजपुत मुखेड नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक बजरंगअप्पा कल्यानी यांनी शिवा मुद्देवाड सह कार्यकर्त्यासह उपस्थित राहून नुतन मुख्याध्यापक राजपुत यांचा शाल,हार घालून स्वागत केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय यलमवाड यांनी नुतन मुख्याध्यापकाचे स्वागत करून अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या..!

# राष्ट्रमाता,राजमाता जिजाऊ,माता सावित्री, माता रमाई जयंती निमित्त आधार फाउंडेशनच्या वतीने जयंती महोत्सवाचे आयोजन


**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

हदगांव येथे दिनांक २९ मार्च वार रविवार वेळ सकाळी ११ वाजता स्थळ संत रोहिदास सभागृह येथे भव्य दिव्य अशा जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला शिवसेना उबाठा गटाचे हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी खासदार सुभाष वानखेडे,माजी आमदार माधवराव पाटील जळगावकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सौ. रोहिणीताई भास्कर दादा वानखेडे नगराध्यक्ष हदगाव, प्रमुख अतिथी म्हणून माननीय सुनील भाऊ सोनुले माजी नगराध्यक्ष हदगाव, मुख्य अतिथी म्हणून माधव दादा जमदाडे रिपब्लिकन सेना, संतोष गव्हाणे संस्थापक अध्यक्ष शिवक्रांती बहुजन संघटना, प्रशांत दादा मुळे प्रदेशाध्यक्ष शिवक्रांती बहुजन संघटना, स्वागताध्यक्ष म्हणून कौशल्याताई रणवीर सामाजिक कार्यकर्ते नांदेड, वैशालीताई हिंगोले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट महाराष्ट्र सचिव महिला आघाडी, तसेच विशेष उपस्थितीहून गोल्डन मॅन राहुल दादा पडघणे, या कार्यक्रमाला प्रमुख व्यक्ते म्हणून फुले शाहू आंबेडकरी व्याख्याते प्रा.परमेश्वर विठ्ठलराव दिपके हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ऍडव्होकेट दीपक पवार, व्याख्याते शिवाजीराव पाटील तसेच सुप्रसिद्ध कवी लेखक आणि व्याख्याते कवठेमहांकाळ जिल्हा सांगली येथील नितीन चंदनशिवे यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्रातील लोकप्रिय गायिका पौर्णिमा कांबळे नांदेड व महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक सतीश राऊत खेडकर यांचा बुद्ध व भीम गीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा.खा.नागेश पाटील आष्टीकर, मा. आमदार बाबुराव कदम कोहळीकर, मा. खा. सुभाष वानखेडे साहेब, मा.आ. माधवराव पाटील जवळगावकर, मा. अनिल पाटील बाभळीकर (मा. जिल्हा परिषद), मा. संजय कांबळे, मा. नथू चौरे, मा.डॉ. राहुल चौरे, ॲड.एच.एम. मदनी (अध्यक्ष हदगांव अभिवक्ता संघ हदगांव मा. सुधाकर दुधारे सर, मा. अमृत चौरे सर, मा. कैलास राऊत, मा. माधव वाढवे, मा. राजेश राऊत सर, मा. लताबाई हटकर, मा. शोभाबाई गिरबिडे, मा. पोर्णिमा सावते, मा. प्रणिता कांबळे, ॲड. सौरूपा अतुल चौरे (भोसले), मा. आनंद आडे, मा. सावित्रीताई शेवाळकर, मा. दादाराव गीरबिडे, (समता सैनिक दल हदगाव) मा. वंदनाबाई वाठोरे, मा. सुशील भाऊ भालेराव (वंचित बहुजन आघाडी) मा.जे की रावळे, मा. नथुराम गायकवाड, मा. साहेबराव हिंगोले, मा. विजय पडगने, मा. शिवाजी अवचार, मा. नारायण पाईकराव सर, मा. मल्हारी भवरे, मा. ढगे सर, मा. स्वाती मनवर, मा. निलावती गायकवाड, मा. जनाबाई बहादुरे, मा. वैशाली अवचार, मा. सई ता रणवीर, मा. कुसुमबाई चौरे, मा. वंदना जमदाडे, मा. संगीता पतंगे मा. मायाबाई मुनेश्वर, मा. रत्नमाला तुळशी, मा. विमल पडघने, मा. शशिकला रायटर, मा. कांताबाई जमदाडे, मा. विमलबाई हिंगोले, मा. सुमनबाई रणवीर, मा. संध्या काळबांडे, मा. भाग्यश्री काळबांडे, मा. दैवत कोल्हे, मा. कल्पना कोल्हे, मा. वंदना कोल्हे, मा. रेखा कोल्हे, मा. निर्मलाबाई खंदारे, मा. शारदा नरवाडे, मा. रंजना इंगोले, मा.ललिता ढगे, मा.विशाखा राऊत, मा. प्रीती ताई दवणे, मा. दरकाबाई कांबळे, मा. उत्तम पाइकराव, मा. मंगल काळबांडे मॅडम, मा. रेखा गिडबिडे, मा. सुरेखा गिरबिडे, मा. लक्ष्मीबाई दवणे, मा. पद्मिनी बाई गिरवी डे, मा. रुक्मिणी बाई गिरबिडे, जयकिनराज रावळे (वंचित बहुजन युवा आघाडी तालुका अध्यक्ष हदगाव) संतोष पाटील मानेमा. चिंतोरेबाई, मा. चंद्रकला कांबळे, मा. रंजना बळखंडे, मा. रतनकराडा मॅडम मा. कानुले सर, मा. जिजाबाई गिरबिडे, मा. कुसुम भाई गिरबिडे, मा. सुनंदाबाई गिरबिडे, मा. शोभाबाई गिरबिडे, मा.शुभांगी कोकरे, मा. अंजनाबाई लक्ष्मण काळबांडे, मा. शिलाबाई सोनवणे, मा. शांताबाई गिरबिडे, मा. डोंगरे माय, मा. कांबळे बाई, मा. वंदनाबाई काळबांडे, मा. शांताबाई खिल्लारे, मा. शारदाबाई गिरबिडे, मा. प्रियंका सावते, मा. कलुमाय गिरबिडे, मा. हटकर माय मा. बडेराव सर मा.प्रा. अनिल खडसे, मा. आम्रपाली गिरबीडे, मा. निलाबाई बहादुरे, मा. रेखा गिरबीडे, मा. वंदना वाठोरे, मा. सुनिता वाठोरे, मा. वैजनाथ पाटिल वानखेडे (सरपंच), मा. दत्ताराम कदम (सरपंच), मा.राजू कैलास दिपके, मा. भाऊराव नरवाडे, मा.प्रमोद जळबा वाठोरे, मा. अविनाश कदम, मा. गंगाबाई पांडुरंग मनवर, आकाश कोठेकर सिरंजनी, राजेश्वर इंगोले सिरंजनी, रामचंद्र पावडे हदगाव, रामजी कालबंडे सावळेश्वर, मा. सोनु दरेगांवकर (जगन दुनियादारीच लेखक) मा. सिघम ढगे, मा.प्रल्हाद भरणे, मा. साईनाथ चंदापुरे, मा. आनंद आडे, मा. निळु पाटील (रा.कॉ. पार्टी हदगांव) मा. अभय वाठोरे (युवा उद्योजक) यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लागणार आहे तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवशाहीर गजानन जाधव वाटेगावकर हे करणार आहेत. व तसेच नव्याने निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचा विशेष सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती आधार फाउंडेशनच्या अध्यक्ष तथा मुख्य आयोजक ऍड. दीक्षाताई जमदाडे (गोडबोले )यांनी कळविले आहे.

## राजभवन येथे शिवस्मारक उभे करावे-संभाजी ब्रिगेडची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर कीतीतरी दिवसांपासून प्रलंबित असलेली मागणी आता जोर धरू लागली आहे.अरबी समुद्रात शिवस्मारक उभारतो उभारतो म्हणत तब्बल तेरा वर्षे झाली. उद्घाटनासाठी सरकारने कोठ्यावधी रुपये खर्चही केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर सत्तेत अलेल्या सरकारने छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक अरबी समुद्रात मोदी व फडणवीस यांनी पूजन करून तेरा वर्षे उलटून गेले पण स्मारक काही उभारले नाही.चालू सरकारांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा जनतेच्या अस्मितेचा मुद्दाचा विसर पडलेला आहे. ज्या ठिकाणी स्मारक होवु शकते असे जमिनीवरील ठिकाण म्हणजे राजभवन. त्याठिकाणी शिवस्मारक उभे करावे अशी मागणी संभाजी ब्रिगेड गेली दहा ते बारा वर्षांपासून लावून धरलेले आहे. पण



सरकारने तो मुद्दा विसरूनच गेलेले आहे. म्हणून आज उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर येथे राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांना उप जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून निवेदन देऊन हा मुद्दा सरकारला आठवून करून दिला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष जेजेराव शिंदे करडखेडवाडीकर यांच्या नेतृत्वाखाली देगलुर व संभाजी ब्रिगेड देगलूर पूर्ण टीम यांच्या माध्यमातून उपजिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित दत्ता पाटील करूरे बालाजी पाटील आंदेगाववाडीकर, बालाजी पाटील हिंगोले,देविदास पाटील थडके,शहाजी पाटील बाबरे, व्यंकट नरवाडेसर,तानाजी सुकणाळे, सतीश पाटील झरीकर, हनुमंत कोसंबे, हनुमंत इंगोले, व्यंकट पाटील थडके, सुरेश महाराज येलबुगडे, प्रजावाणीचे पत्रकार मनोहर देगावकर, पत्रकार पांडुरंग पुठेवाड हे उपस्तित होत

## भोंदू बाबा अशोक खरात याच्या सह त्याच्या पाठीराख्यावर महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची अंनिसची मागणी

## परळी तहसील कार्यालयावर भव्य निदर्शने

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात याच्यासह याप्रकरणी संबंध असणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या वतीने करण्यात आले आहे याप्रकरणी दिनांक २५. मार्च रोजी परळी तहसील कार्यालयावर अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या वतीने भव्य निदर्शने करण्यात आली.



परळी येथे दिनांक २५.मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता परळी तहसील कार्यालयावर भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर महिलांच्या शोषणाप्रकरणी तसेच अघोरी कृत्य जादूटोणा करून लोकांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली याप्रसंगी अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीचे प्रा. विलास रोडे, सुकेशनी नाईकवाडे, प्रा.दासु वाघमारे, अशोक मुंडे,विकास वाघमारे, नवनाथ दाने,संजीब रॉय, अनंत इंगळे, श्रीकांत पाथरकर,विठ्ठलराव झिलमेवाड, भगवान राठोड, भानुदास उफडे, सिद्धार्थ जगतकर, दीपक शिरसाट ,बालाजी ढगे, बाबा शेख, महादेव आजले, विजय रोडे, जिवन वाघमारे ,बाबासाहेब पाचंगे, प्रकाशसिंग तुसाम,भीमरावजी गोदाम, एच.आर.मस्के, प्रा.एस.व्ही. जाधव,अंकुश मुंडे यांच्या सह अदी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कीर्तनकार ह.भ.प श्रीहरी महाराज पुरी यांच्या पत्नी आणि मुलाचा अपघातात होरपळून मृत्यू

## धडके नंतर गाडीने घेतला पेट : आगीत दोघांचा जागीच होरपळून मृत्यू

## बीड अहिल्या नगर रोडवर धामणगाव जवळ कापसी पाटीवर हायवा आणि कारची धडक

### विचित्र योगायोग

**ज्यावेळी या मायलेकरांचा आगीत होरपळून मृत्यू झाला त्यावेळी हभप श्रीहरी महाराज पुरी यांचे कडा येथून जवळच असलेल्या केरूळ येथील अखंड सप्ताहात काल्याचे कीर्तन सुरू होते. कीर्तन सुरू असताना त्यांना अनेकांचे फोन आले म्हणून त्यांनी माईक बंद करून फोन उचलला आणि त्यांना ही दुर्दैवी बातमी समजली.**

### एकत्र अंतिम संस्कार

**अपघातात दुर्दैवी मृत्यू आलेल्या सौ. पुष्पा पुरी आणि त्यांचा मुलगा ऋषिकेश या दोघा मायलेकांवर एकत्रच अंतिम संस्कार करण्यात येत आहेत. ही घटना हृदय पिळवटून टाकणारी आहे.**

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**





आष्टी तालुक्यातील अंमळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बीड अहिल्यानगर महामार्गावर कापसी फाट्या जवळ शुक्रवारी दि.२७ मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता काळजाचा थरकाप उडवणारा अपघात पाहायला मिळाला. एक हायवा टिप्पर आणि कार यांच्यात झालेल्या भीषण धडके नंतर कारने अचानक पेट घेतला. या आगीत कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी यांची पत्नी आणि मुलगा यांचा जागीच होरपळून मृत्यू झाला. आग लागल्या नंतर दोघा माय-लेकरांनी कारमधून बाहेर पडण्याचा जीवाच्या आकांताने प्रयत्न केला परंतु ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध कीर्तनकार आणि ग्रामपंचायत अधिकारी असलेले ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी (रा. साळेगाव ता. केज) यांची पत्नी सौ. पुष्पा श्रीहरी पुरी वय (४७ वर्ष) आणि त्यांचा मुलगा ऋषिकेश श्रीहरी पुरी हे शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी आष्टी येथून अहिल्यानगर बीड या रस्त्याने त्यांची कार क्र. (एम एच-१६/बी वाय-३८३९) बीड कडून बीडकडे जात होते. त्यांची कार धामणगाव पासून पुढे जात असताना कापशी फाट्या जवळ समोरून भरधाव वेगात येत असलेल्या हायवा टिप्पर क्र. (एम एच-१६/सी डी-७३०५) ने जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, अपघातात कारचा चकनाचूर झाला आणि कारने पेट घेतला. आग एवढी भीषण होती की, या आगीत कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी यांची पत्नी सौ. पुष्पा श्रीहरी पुरी वय (४७ वर्ष) आणि त्यांचा सी ए असलेला मुलगा चि. ऋषिकेश श्रीहरी पुरी वय (२८वर्ष) यांचा जागीच जळून कोळसा झाला. अपघातातील मयत आई आणि मुलांवर त्यांच्या मूळगावी साळेगाव ता. केज येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.जिथे अपघात झाला त्या ठिकाणी शेतकरी मिठू गोल्हार यांनी पाणी टाकून आग विझविण्याचा प्रयत्न केला. तसेच पाण्याची मोटार सुरू करून आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला परंतु आग मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना वाचवू शकले नाहीत. मृत्यू पावलेले माय लेक शेवट पर्यंत आगीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होते परंतु त्यांना यश आले नाही. अशी माहिती अपघातस्थळा वरून मिठू गोल्हार यांच्या पत्नी मनिषा गोल्हार यांनी माहिती दिली आहे.



### अपघातग्रस्तांना वाचविण्यात अपयश

**अपघात झाल्या नंतर त्या ठिकाणी असलेले गावकरी आणि शेतकरी यांनी आग विझविण्याचा आणि आतील जखमी माय-लेकरांना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले मात्र ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.**

### जीव वाचविण्याची धडपड


**अपघातातील जखमी माय लेक आगीत जळत असताना त्यांनी जीव वाचविण्यासाठी जीवाच्या आकांताने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचा तडफडून दुर्दैवी मृत्यू झाला.**

# युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळ्यास भाविक भक्तांची अलोट गर्दी

## भाविकांनी भरलेल्या मानाच्या १२ गाड्या ओढल्या

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसुफ वडगांव येथे श्रीरामनवमी जन्मोत्सवास सोहळ्यास मोठ्या उत्साहात. सुरुवात झाली. दशरथनंदन श्रीरामचंद्र महाराज की जय असा जयघोष करीत भाविकांनी भरलेल्या १२ गाड्या ओढण्याची परंपरा कायम ठेवली. युसूफवडगांव येथे अतिशय प्राचीन राम मंदीरात प्रभू रामचंद्रा सोबत सीता माता, लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न, आणि मारुती या देवतांच्या पंचधातुच्या मुर्ती आहेत.मंदिरात चैत्रशुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केल्यानंतर दशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले,रामनवमी निमित्त पहाटे सर्व मुर्तींना



अभिषेक घालून दुपारी प्रभुरामांची मुर्ती एका सजवलेल्या पाळण्यात ठेवण्यात आली.श्रीराम मंदिरात श्रीधर महाराज रामदासी यांचे नारदीय गुलालाचे किर्तन झाले. दुपारी बारा वाजेच्या सुमारास दशरथनंदन रामचंद्र महाराज की जय असा जयघोष करीत गुलाल पुष्प उधळून राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर गावातून रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक वेशीमध्ये आल्यावर १२ बैलगाड्या एकमेकांना बांधून भाविकांनी भरलेल्या या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला.गाड्या ओढण्याचा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी गावातील व परिसरातील हजारो नागरिकांनी गर्दी केली होती.यावर्षी मानाच्या गाड्या ओढण्याचा मान रामभक्त गंपु जंगल घायाळ यांना होता.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन दि २६ मार्च २०२६ वार गुरुवार रोजी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती सांची बुद्ध विहार केसापुरी कॅम्प या ठिकाणी साजरी करण्यात आली या कार्यक्रमाची शुरूवात दु २.०० वा तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर व सम्राट अशोक यांच्या प्रतिमांचे पुजन करुण धम्म वंदनेने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा संस्कार उपाध्यक्षा तथा केंद्रीय शिक्षिका आद लिलाताई उजगरे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे, जिल्हा




पर्यटन सचिव के व्ही साळवे, जिल्हा संस्कार सचिव आशाताई मोरे महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे, हे उपास्तीत होते. या ठीकाणी लिलाताई उजगरे, एस बी मोरे, के व्ही साळवे, यांनी प्रियदर्शी , चक्रवर्ती राजा सम्राट अशोक यांच्या जिवनावर मार्गदर्शन केले व प्रत्येक कार्यक्रमांमध्ये बुद्ध बाबासाहेब यांच्या बरोबर सम्राट अशोकाचा फोटो लावण्या चे आवाहन केले तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष प्रा एल आर मस्के यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर हा कार्यक्रमासाठी , डी एस साळवे, नितिन डोंगरे, मोहन काकडे , तात्यासाहेब साळवे, आत्माराम पौळ ,विजय मस्के, अनुराधा साळवे, कोमल डोंगरे, वंदना साळवे याच्या सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी धम्म उपासक उपासिका उपस्तीत होते.

# केज तहसीलदार राकेशजी गिड्डे यांचा ‘उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव’ पुरस्काराने सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तहसीलचे कर्तव्यदक्ष व जनतेशी सुसंवाद साधणारे अधिकारी तहसीलदार राकेशजी गिड्डे यांचा त्यांच्या उल्लेखनीय प्रशासकीय कार्याची दखल घेत भव्य सन्मान करण्यात आला. मराठी पत्रकार संघ मुंबई तसेच राष्ट्रीय पत्रकार संघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना ‘उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले.तहसीलदार गिड्डे यांनी आपल्या कार्यकाळात पारदर्शक, जलद आणि लोकाभिमुख प्रशासनाची अंमलबजावणी करत सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. महसूल विभागातील विविध कामांमध्ये त्यांनी दाखवलेली तत्परता, निर्णयक्षमता आणि जनहिताची भूमिका यामुळे त्यांचे कार्य विशेष ठरले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पत्रकार संघटनांकडून हा सन्मान देण्यात आला.या सन्मान सोहळ्यावेळी पत्रकार हनुमंत भोसले,



रामदास तपसे, गौतम बचुटे, संतोष गालफाडे, महादेव गायकवाड, पांडुरंग कसबे, चंद्रकांत पाटील तसेच संपादक अजय भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी गिड्डे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.सन्मान स्वीकारताना तहसीलदार गिड्डे यांनी हा पुरस्कार आपल्या संपूर्ण प्रशासनिक टीमचा असल्याचे नमूद करत, पुढील काळातही नागरिकाभिमुख सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला.केज तालुक्यासाठी अभिमानास्पद क्षण ठरलेला हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अशोक नगर कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी आनंद शिंदे, उपाध्यक्षपदी अनिल भराटे तर कोषाध्यक्षपदी रोहित भैय्या साळवे यांची निवड

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सम्राट अशोक नगर माजलगाव येथील बुद्ध विहारांमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

यावेळी ही कार्यकारिणी विजय दादा साळवे, अविनाश जावळे, राकेश दादा साळवे, ड. नंदकिशोर खळगे, सिद्धार्थ ससाने यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली असून या बैठकीस अशोक नगर येथील सामाजिक कार्यकर्ते तरुण मंडळी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती. जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आनंद शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अनिल भराटे कोषाध्यक्ष पदी रोहित भैय्या साळवे सचिव पदी सार्थक शिंदे प्रसिद्धी





प्रमुख पदी पत्रकार पृथ्वीराज निर्मळ, संघटक नितीन प्रधान, सजावट प्रमुख नितीन जावळे सल्लागारपदी भारत तांगडे, बाबासाहेब सूर्यवंशी, मुंजाभाऊ वैराळे, श्रीहरी नाना भोजने, कांबळे सर, अशोक कांबळे, धोंडीराम ढालमारे, अमोल शेरकर, शत्रुघन कसबे, सिद्धार्थ खिल्लारे यांची नियुक्ती करण्यात आली असून हा जयंती उत्सव डीजे ला फाटा देत डीजे मुक्त करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून पारंपारिक वाद्याच्या स्वरूपात जयंती उत्सव मिरवणूक काढण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या जयंती उत्सवानिमित्त सम्राट अशोक नगर येथे सामाजिक सांस्कृतिक व प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नूतन कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रेरणादायी संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला. हा जयंती उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले. या जयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी चे उपस्थितांच्या वतीने अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस सचिन जावळे, प्रशिक साळवे, प्रशांत अवचार, पवन राजे शेळके, केतन क्षीरसागर, महेंद्र भाग्यवंत, विशाल पायके, सुरेश नाना क्षिरसागर, करण बापू वावळकर, नितीन गायकवाड, धम्मपाल देशमाने, पियुष निर्मळ, सुरेश बनसोडे, गुड्डू साळवे, विराट चांदमारे, बुद्धीराज सिरसट, मिलिंद शिंदे, रतन राऊत, राजू मोगरेकर, आकाश भद्रे, सौरभ सिरसट, विवेक जाधव, संतोष क्षिरसागर, विजय वैराळे, प्रणव मोरे आदींची उपस्थिती होती.

# रिपब्लिकन सेनेची जिल्हास्तरीय संवाद बैठक २९ मार्चला बीडमध्ये नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष डॉ.सुशील सूर्यवंशी यांचा सत्कार समारंभ

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेच्या संघटनात्मक बांधणीस नवी दिशा देण्यासाठी जिल्हास्तरीय व्यापक संवाद बैठकीचे आयोजन येत्या रविवार, २९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहात करण्यात आले आहे. या बैठकीचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे नेते विजय साळवे करणार असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे.रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुका कार्यकारिण्या बरखास्त करून पक्षबांधणीला गती दिली आहे. त्याच पार्श्वभूमीवर डॉ. सुशील सूर्यवंशी यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, या निर्णयामुळे पक्षाला नवचैतन्य मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.या बैठकीत बीड जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून, नूतन प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांचा जिल्ह्याच्या वतीने सत्कारही केला जाणार आहे. परळी, अंबाजोगाई, केज, गेवराई, माजलगाव, शिरूर, धारूर आदी सर्व तालुक्यांतील इच्छुक पदाधिकारी व आंबेडकर घराण्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.रिपब्लिकन सेनेचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर मजबूत करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात असून, बीडपासून पक्षबांधणीच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.





हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077